जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 AUG 2025
सकाळ

# 'होळकरशाहीतील कोरीव लेख' संशोधनातील आदर्श

## कुलगुरू डॉ. शिर्के : अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २० : 'होळकरशाहीतील कोरीव लेख' ग्रंथ म्हणजे बहुविद्याशाखीय अभ्यास आणि संशोधनाचे आदर्श उदाहरण आहे,' असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्षानिमित्त अध्यासन ग्रंथमालेतील तिसरे पुष्प 'होळकरशाहीतील कोरीव लेख' या डॉ. नीलेश केदारी शेळके लिखित ग्रंथाचे डॉ. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थित प्रकाशन झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. नीलेश शेळके लिखित 'होळकरशाहीतील कोरीव लेख' ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. अवनीश पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. शेळके, डॉ. मच्छिंद्र गोफणे, दत्ता घुटूगडे आदी.

डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. शेळके यांनी या ग्रंथासाठी मोठी श्रमंती केल्याचे लक्षात येते. आधी शिलालेख आणि ताम्रपटांची माहिती मिळविणे, ठिकठिकाणी प्रवास करून संबंधित दुर्मीळ लेखांचा शोध घेऊन त्याची पाहणी करणे, त्याचे अध्ययन, संशोधन करून योग्य अन्वयार्थ लावणे आणि त्यानंतर त्याचा संकलनात समावेश करणे हे मराठीसह मोडी, हिंदी, इतिहास, पुराभिलेखादी विषयांमधील मौलिक कार्य आहे. ग्रंथात काशी येथील मल्हारराव होळकर, खंडेराव होळकर आणि अहिल्यादेवी या तिघांच्याही नावाचा समावेश असलेला शिलालेख आहे, कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिराच्या पूर्व दरवाजावरही होळकरांचा शिलालेख आहे. काशी आणि दक्षिण काशी येथील या दोन्ही शिलालेखांच्या प्रतिकृती तयार करून माहितीसह विद्यापीठाच्या संग्रहालयात प्रदर्शित कराव्यात. अध्यासनाने अधिक संशोधन करण्यासाठी प्रकल्प प्रस्ताव सादर करावा.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, 'मंदिरे, विविध ऐतिहासिक वास्तू येथील लेखांकडे पर्यटनापेक्षा अभ्यास आणि संशोधन म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित करण्याची आवश्यकता आहे. डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत केले. डॉ. शेळके यांनी मनोगत व्यक्त केले. दत्ता घुटुगडे यांनी आभार मानले. यावेळी बबन रानगे, डॉ. नीलांबरी जगताप, वैभव जानकर, अमर माने आदी उपस्थित होते.

### 'मातोश्री' अहिल्यादेवी होळकर

■ इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील म्हणाले, 'कोरीव लेखांतून होळकर घराण्याने केलेल्या कार्याची कल्पना येतेच. शिवाय त्यांचा अन्वयार्थ, दस्तऐवजीकरण यामधून त्या इतिहासाला ठोस पाठबळ लाभते. अहिल्यादेवी होळकर यांना त्या काळात 'मातोश्री' हे संबोधन वापरले जात असे, हा एक नवा संदर्भही सामोर आणण्याचे काम या संशोधनाद्वारे डॉ. शेळके यांनी केले.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2025
सकाळ



कोल्हापूर : पैलवान रोहन पवार यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर.

# पैलवान रोहन पवार याचा शिवाजी विद्यापीठात सत्कार

कोल्हापूर, ता. २० : रांची (झारखंड) येथे २२ ते २५ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या २३ वर्षे वयोगटातील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ कुस्ती संकुलातील पैलवान रोहन पवार याची राज्य कुस्तीगीर संघटनेच्या वतीने निवड झाली. या निवडीबद्दल विद्यापीठ क्रीडा विभागाच्या वतीने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सत्कार झाला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, प्रा. किरण पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2025

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिनी शपथ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज शांती आणि अहिंसेची शपथ घेत सद्भावना दिन साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अरविंद मडावी यांनी सर्व उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रशांत पाटील यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, राष्ट्रीय छात्रसेनेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

2 1 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नशामुक्त युवक’ हीच देशाची खरी ताकद

## पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता : शिवाजी विद्यापीठात ‘नशामुक्ती’वर व्याख्यान

कोल्हापूर, ता. २० : ‘नशामुक्त युवक हीच देशाची खरी ताकद आहे,’ असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, राष्ट्रीय सेवा योजना, इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, राजारामपुरी पोलिस ठाण्यातर्फे ‘नशामुक्ती’वर व्याख्यान झाले, त्या वेळी ते बोलत होते.



कोल्हापूर : पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांचे स्वागत करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे. शेजारी डावीकडून डॉ. धीरजकुमार बच्चू, सिद्धार्थ शिंदे, डॉ. संतोष प्रभू, डॉ. अजित कोळेकर, हर्षवर्धन पंडित.

गुप्ता म्हणाले, ‘नशा ही केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीतही अडथळा आणते. गुन्हेगारी, अपघात हे थेट व्यसनाशी जोडलेले आढळतात. ‘बी फॉर बर्थ’ आणि ‘डी फॉर डेथ’ यामध्ये ‘सी फॉर चॉईस’ असतो. हाच चॉईस आपण सदसद्विवेक बुद्धीने निवडला पाहिजे. नशामुक्तीसाठी संवाद आणि समुपदेशन आवश्यक असून, युवक हीच देशाची खरी ताकद आहे. नशामुक्त सुदृढ तरुणाईसाठी ठाम निश्चय करणे आवश्यक आहे.’

न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू म्हणाले, ‘क्षणिक सुखाकरिता व्यसनाधीन न होता कष्ट करून चिरकाल टिकणारा आनंद मिळवता आला पाहिजे. मद्यपान, धूम्रपान आणि अमली पदार्थांमुळे यकृत, हृदय आणि स्नायूंवर गंभीर परिणाम होतातच; पण त्याशिवाय व्यक्तीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्थैर्यावरही परिणाम होतो. व्यसनामुळे स्मरणशक्ती कमी होते, मेंदूवर परिणाम होतो, नैराश्य, आत्महत्येचे प्रमाण वाढते. अमली पदार्थांबरोबर समाजामधील मोबाईल फोन्स, सोशल मीडियाचे वाढते व्यसन चिंताजनक असून, त्यामुळे कुटुंबसंस्थेला धोका निर्माण होत आहे.’

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, ‘उत्तम नागरिक होण्यासाठी योग्य पर्यायांची निवड करणे महत्त्वाचे असून, आरोग्यास हानिकारक व्यसनांपासून दूर राहून व्यक्तिमत्त्व घडविणाऱ्या सवयींची निवड करावी. व्यक्तिमत्त्व घडविताना उत्कृष्ट पुस्तके वाचली पाहिजेत. जाणीवपूर्वक चांगले छंद जोपासले पाहिजेत.’

अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. धीरजकुमार बच्चू यांनी ‘फियर ऑफ मिसिंग आऊट’ या गैरसमजामुळे अनेकदा तरुण व्यसनांच्या आहारी जात असल्याचे सांगितले. शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

शहर पोलिस उपअधीक्षक प्रिया पाटील, राजारामपुरी पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुशांत चव्हाण उपस्थित होते. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. विभागाचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी आभार मानले.

2 1 AUG 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नशामुक्त युवक हीच देशाची खरी ताकद

## जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता; शिवाजी विद्यापीठात 'नशामुक्ती'वर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नशा ही केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब व समाजाच्या प्रगतीलाही अडथळा आणते. गुन्हेगारी व अपघात ही थेटपणे व्यसनाशी जोडलेली आढळतात. नशामुक्त युवक हीच देशाची खरी ताकद आहे, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'नशामुक्ती' विषयावर व्याख्यानाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, कुलसचिव डॉ. विलास शिंदे. डॉ. संतोष प्रभू आदी मान्यवर.

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, राष्ट्रीय सेवा योजना, इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल व राजारामपुरी पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्ती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षक योगेशकु मार गुप्ता म्हणाले, 'बी' फॉर बर्थ आणि 'डी' फॉर डेथ यामध्ये 'सी' फॉर चॉईस असतो व हाच चॉईस आपण सदसद्विवेक बुद्धीने निवडला पाहिजे. संवाद व समुपदेशन नशामुक्तीसाठी गरजेचे असून, युवक हीच देशाची खरी ताकद आहे. नशामुक्त सुदृढ तरुणाईसाठी ठाम निश्चय करणे आवश्यक आहे.

न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू म्हणाले, क्षणिक सुखाकरिता व्यसनाधीन न होता, कष्ट करून चिरकाल टिकणारा आनंद मिळवता आला पाहिजे. मद्यपान, धूम्रपान आणि अमली पदार्थ यामुळे यकृत, हृदय आणि स्नायूंवर गंभीर परिणाम होतातच, पण त्याशिवाय व्यक्तीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्थैर्यावरदेखील परिणाम होतो. मोबाईल, सोशल मीडिया यांचे वाढते व्यसन चिंताजनक असून, त्यामुळे कुटुंब संस्थेला धोका निर्माण होत आहे.

अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. धीरजकुमार बच्चू, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, उत्तम नागरिक होण्यासाठी योग्य पर्यायांची निवड करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

हर्षवर्धन पंडित यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अजित कोळेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास शहर डीवायएसपी प्रिया पाटील, राजारामपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 AUG 2025
पुढारी

# नशामुक्त युवकच देशाची खरी ताकद

## पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नशा ही केवळ व्यक्तीच्या आरोग्यालाच नव्हे, तर कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीलाही मोठा अडथळा आहे. त्यामुळे नशामुक्त युवकच देशाची खरी ताकद आहेत, असे मत जिल्हा पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी व राजारामपुरी पोलिस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नशामुक्ती' व्याख्यानात ते बोलत होते.

गुप्ता यांनी 'बी फॉर बर्थ, डी फॉर डेथ आणि सी फॉर चॉईस' यातील योग्य निवडीचे महत्त्व सांगत व्यसन आणि गुन्हेगारीतील थेट संबंध स्पष्ट केला. न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांनी व्यसनाचे शारीरिक-मानसिक दुष्परिणाम आणि मोबाईलच्या अतिवापराचे धोके सांगितले. तर, अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. धीरजकुमार बच्चू यांनी 'फियर ऑफ मिसिंग आऊट'मुळे तरुणाई व्यसनाधीन होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी चांगल्या सवयी व उत्तम पुस्तके जोपासून व्यसनांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला. प्रा. सिद्धार्थ शिंदे, प्रिया पाटील, पोलिस निरीक्षक सुशांत चव्हाण, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 AUG 2025
लोकमत

# नशेमुळे स्वतःसह कुटंबाचेही नुकसान

## पोलिस अधीक्षक योगेश कुमार; विद्यापीठात नशामुक्तीवर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नशा ही केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीलाही अडथळा आणते. व्यसनांमुळे गुन्हेगारी आणि अपघातांचे प्रमाण वाढते. नशामुक्त युवक हीच देशाची खरी ताकद आहे, असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक योगेश कुमार यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, राष्ट्रीय सेवा योजना, इन्स्टिट्युशन्स इनोव्हेशन कौन्सिल व राजारामपुरी पोलिस



विद्यापीठात नशामुक्ती विषयावर पोलिस अधीक्षक योगेश कुमार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

ठाण्याच्या वतीने आयोजित 'नशामुक्ती' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

पोलिस अधीक्षक गुप्ता म्हणाले, 'बी' फॉर बर्थ आणि 'डी' फॉर डेथ यामध्ये 'सी' फॉर चॉइस असतो. हाच चॉइस आपण सदसद्विवेकबुद्धीने निवडला पाहिजे. संवाद व समुपदेशन नशामुक्तीसाठी गरजेचे आहे. मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. संतोष प्रभू म्हणाले, क्षणिक सुखासाठी व्यसनाधीन न होता, कष्ट करून चिरकाल टिकणारा आनंद मिळवावा. मद्यपान, धूम्रपान आणि अमली पदार्थ यामुळे यकृत, हृदय आणि स्नायूंवर गंभीर परिणाम होतात. अपर पोलिस अधीक्षक डॉ. धीरजकुमार बच्चू, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. हर्षवर्धन पंडित यांनी प्रास्ताविक केले. विभागाचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 AUG 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठात आज प्रशांत बोरा यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** ७६ व्या राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त पुणे येथील बोरा मल्टिकॉर्पचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत बोरा यांचे व्याख्यान शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (दि. २१) आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठ व दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फौंड्रीमन या संस्थेचे कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरुवारी दुपारी ४ वाजता प्रशांत बोरा यांचे 'स्केलिंग बियाँड कम्फर्ट झोन्स' या विषयावर व्याख्यान होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील असतील, अशी माहिती विद्यापीठ-उद्योग साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, समन्वयक डॉ. सुभाष माने, फाउंडेशनचे अध्यक्ष राहुल पाटील, उपाध्यक्ष सतीश कडूकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 AUG 2025
पुढारी

# राष्ट्रपती पदकासाठी ३१ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश विभागातर्फे हुशार व गुणी विद्यार्थ्यांकरिता विविध पारितोषिके जाहीर केली जातात. शिवाजी विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रपती पदकासाठी पात्र विद्यार्थ्यांनी दि. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत, असे अवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. 'दि प्रेसिडेंट ऑफ इंडिया मेडल फॉर जनरल प्रोफिशियन्सी, शिवाजी युनिव्हर्सिटी' हे पारितोषिक १९९४-९५ पासून विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येते. शैक्षणिक २०२४-२५ पासून या पारितोषिकासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. दि. ३१ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल करावेत. अधिक माहितीसाठी पदव्युत्तर प्रवेश विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2025
तरुण भारत

# राष्ट्रपती पदकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रपती पदकासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. हुशार आणि गुणी विद्यार्थ्यांसाठी विविध पारितोषिके जाहीर करण्यात येतात. १९९४-९५ पासून 'दि प्रेसिडेंट ऑफ इंडिया मेडल फॉर जनरल प्रोफिशियन्सी, शिवाजी युनिव्हर्सिटी' पारितोषिक विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येते. २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी या पारितोषिकासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2025
सकाळ



# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ अनुदान आयोग योजनेंतर्गत अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, ई.डब्ल्यू.एस (नॉन क्रिमिलेअर) आणि अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन), खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा अर्ज 'ऑफलाइन' मागविण्यात येत आहेत. हे अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) यूजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पिटेटिव्ह एक्झामिनेशन्सवर उपलब्ध आहेत. प्रवेश परीक्षा अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. २१ तारखेपासून ३० ऑगस्टपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित केंद्राच्या कार्यालयात सकाळी १०.३० ते सायंकाळी सहापर्यंत जमा करावेत. प्रवेश परीक्षा ९ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते सायंकाळी साडेपाच वेळेत 'ऑफलाइन' पद्धतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत येथे घेण्यात येईल, असे संचालक डॉ. प्रकाश कांबळे यांनी कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2025

तरुण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**■ २१ ते ३० ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, युजी.सी. नवी दिल्ली योजनेअंतर्गत एस.सी, एस.टी, ओबीसी, ई.डब्ल्यू.एस (नॉन क्रिमीलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) आणि खुल्या गटातील (SC/ST/OBC/SEBC/EWS/OPEN/Minority Community) विद्यार्थ्यांकरिता प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर युजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पिटिटिव्ह एक्झामिनेशन्सवर उपलब्ध् आहेत. तसेच प्रवेश परीक्षा अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध् आहेत. २१ ते ३० ऑगस्टपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासहित केंद्राच्या कार्यालयात जमा करावा. प्रवेश परीक्षा ९ सप्टेंबररोजी सायंकाळी चार ते साडेपाच या वेळेत ऑफलाईन पद्धतीने होणार आहे, याची नोंद घ्यावी, असे संचालक डॉ. प्रकाश कांबळे यांनी सांगितले.